Rayat Shikshan Sanstha's

# Dahiwadi College Dahiwadi

Dept of Library

News paper Cliping 2019-20

दैनिक सकाळ दि. 21/08/2019



दहिवडी : डी. सी. पॅटर्नच्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना वैभव राजेघाटगे. उपस्थित मान्यवर. (रूपेश कदम : सकाळ छायाचित्रसेवा)

## आत्मविश्वास, वक्तशीरपणामुळे अत्युच्च यश : वैभव राजेघाटगे

### दहिवडी कॉलेजमध्ये डी. सी. पॅटर्नअंतर्गत मार्गदर्शन

**दहिवडी, ता. २० :** आत्मविश्वास व वक्तशीरपणा आपल्याला अत्युच्च यश देतात. ध्येय निश्चित करा व संकल्पना स्पष्ट असूद्या, असे प्रतिपादन अर्थ मंत्रालयाचे उपसचिव वैभव राजेघाटगे यांनी केले.

दहिवडी कॉलेजमध्ये बारावी विज्ञान शाखेसाठी सुरू केलेल्या डी. सी. पॅटर्न अंतर्गत मार्गदर्शन करताना ते बोलत होते. या वेळी प्राचार्य डॉ. बी. टी. जाधव उपस्थित होते.

राजघाटगे म्हणाले, "आपले महाविद्यालय व शिक्षकांबद्दल आदर बाळगा. विद्यार्थ्यांनी अभ्यासासाठी एकाग्रचित्त होणे आवश्यक आहे. शिक्षकांनी पालक व शिक्षक अशी दुहेरी भूमिका निभवावी. विद्यार्थ्यांनी रोज व्यक्तिगत पातळीवर वेळापत्रकानुसार अभ्यास करावा. जास्तीतजास्त पुस्तके वाचावीत. कष्ट व सहनशीलता अंगी बाळगावी. आत्मविश्वास व वक्तशीरपणा असल्यास यश सहज मिळते. मनात कोणताही न्यूनगंड बाळगू नये.

जाधव म्हणाले, "जीवनातील प्रत्येक गोष्टीचा अग्रक्रम ठरविणे गरजेचे आहे. अभ्यास हा नेहमी आपल्याला संपूर्ण माहिती कळेपर्यंत करावा. डी. सी. पॅटर्नमधील सर्व विद्यार्थी हुशार असून, त्यांना सर्व प्रकारच्या सुविधा महाविद्यालयात पुरविल्या जातात. काळानुसार सर्वांनी गुणवत्तेनुसार स्पर्धेत टिकण्यास सक्षम बनावे."

प्रा. डॉ. व्ही. पी. गायकवाड यांनी कार्यक्रमाचे संयोजन केले. प्रा. व्ही. एस. पाटोळे यांनी स्वागत केले. प्रा. एम. एम. देठे यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. टी. एस. माने यांनी आभार मानले.

दैनिक सकाळ दि: 30/08/2019

# दहिवडीत शनिवारी मॅरेथॉन स्पर्धा

**दहिवडी, ता. २९ :** दहिवडी कॉलेज दहिवडी येथे रयत शिक्षण संस्थेच्या शतक महोत्सवी वर्षानिमित्ताने महाविद्यालयातील विद्यार्थी, विद्यार्थिनी व सेवक यांच्यासाठी ३१ ऑगस्ट सकाळी साडेसात वाजता 'रन फॉर स्किल एज्युकेशन' हे उद्दिष्ट ठेवून मॅरेथॉन स्पर्धा होणार आहे. ही स्पर्धा पुरुषांसाठी सहा किलोमीटर व महिलांसाठी चार किलोमीटर आहे. या स्पर्धेत ब्रॅंड ॲम्बेसिडर म्हणून महाविद्यालयाच्या माजी विद्यार्थिनी अपेक्षा दडस, वैष्णवी सावंत, पवन माने हे सहभागी होणार आहे.

या स्पर्धेचे आयोजन क्रीडा विभागाचे प्रमुख उदय शिंदे व अमीर जाधव यांनी केले आहे. मॅरेथॉन स्पर्धेत सर्वांनी सहभागी व्हावे, असे आवाहन प्राचार्य डॉ. जाधव यांनी केले.

दैनिक सकाळ दि. 04/09/2019



**दहिवडी : महाविद्यालयाच्या कनिष्ठ विभागाच्या पालक, विद्यार्थी मेळाव्यात मार्गदर्शन करताना बी. टी. जाधव. व्यासपीठावर मान्यवर.**
(**रूपेश कदम** : सकाळ छायाचित्रसेवा)

# स्पर्धेच्या युगात टिकण्यासाठी गुणवत्तेशिवाय नाही पर्याय

## डॉ. जाधव; दहिवडी कॉलेजमध्ये पालक मेळावा

**दहिवडी, ता. ३ :** ''स्पर्धेच्या युगात टिकण्यासाठी गुणवत्तेशिवाय पर्याय नाही. सर्वगुणसंपन्न विद्यार्थी घडविताना अभ्यासाबरोबरच उत्कृष्ट आहार विद्यार्थ्यांना देणे गरजेचे आहे,'' असे मत प्राचार्य डॉ. बी. टी. जाधव यांनी व्यक्त केले.

दहिवडी कॉलेजच्या कनिष्ठ वाणिज्य विभागाच्या पालक मेळाव्यात ते बोलत होते. या मेळाव्यास प्रा. डॉ. बी. एस. बळवंत, प्रा. टी. एस. माने, प्रा. व्ही. एस. मस्के, प्रा. एन. डी. दबडे व पालक उपस्थित होते.

डॉ. जाधव म्हणाले, ''माणदेशी माती अनेक गुणवान अधिकाऱ्यांची भूमी आहे अन् या परंपरेचे तुम्ही वारसदार आहात. दुष्काळाशी सामना करताना महाविद्यालयाने शैक्षणिक गुणवत्तेकडेही लक्ष दिले आहे. सीपीटी कोर्स, टॅली, बँकिंग कोर्स, विद्यार्थी गुणवत्तावाढ प्रकल्प, विद्यार्थी कौशल्य विकास कार्यशाळा, यशस्वी उद्योजक कार्यशाळा, मार्केटिंग मेळावा इत्यादी अनेक उपक्रम त्यासाठी राबवले जात आहेत. विद्यार्थ्यांनी त्याचा फायदा घ्यावा आणि पालकांनी त्यास साथ द्यावी, तरच शिस्तप्रिय विद्यार्थी घडविण्यात आपण यशस्वी होऊ.''

पालक प्रतिनिधी म्हणून पाटील, खाडे, देवकर यांनी व विद्यार्थ्यांनी मनोगते व्यक्त केली. विभागप्रमुख प्रा. व्ही. एस. मस्के यांनी प्रास्ताविक केले. प्रा. पी. बी. बोराटे यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. डी. पी. गुजले व प्रा. एस. एम. पाटील यांनी आभार मानले.

दैनिक सकाळ दि० ६/०९/२०१९

# दहिवडी कॉलेजमधील विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती

दहिवडी, ता. ५ : येथील रयत शिक्षण संस्थेच्या दहिवडी कॉलेजमधील विज्ञान विभागातील एकूण सात विद्यार्थ्यांना पुणे येथील मल्होत्रा विक्फिल्ड फाउंडेशनची शिष्यवृत्ती मंजूर झाली आहे.

या फाउंडेशनमार्फत दरवर्षी राज्यातून विज्ञान शाखेमध्ये शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांची ऑनलाइन परीक्षा घेतली जाते. यातून उत्तीर्ण विद्यार्थ्यांना मुलाखतीसाठी बोलविले जाते. यात यशस्वी विद्यार्थ्यांना पुढील शिक्षणासाठी प्रोत्साहन म्हणून प्रत्येकी दहा हजार रुपये रोख रक्कम व प्रमाणपत्र प्रदान करण्यात येते. मागील शैक्षणिक वर्षात महाविद्यालयातील प्राणिशास्त्र विभागातील अंजली संतोष सोनावणे, शुभांगी सतीश शिंदे, गायत्री विनायक चांदवले, रूपाली नामदेव माने, शीतल संजय कोकरे व भौतिकशास्त्र विभागातील धनश्री ज्ञानदेव काटकर, प्रणाली जाधव यांनी ही शिष्यवृत्ती मिळविली आहे. त्यांना २२ सप्टेंबर २०१९ रोजी पुणे येथे सन्मानित करण्यात येणार आहे. या विद्यार्थ्यांना विज्ञान शाखेतील प्रा. डॉ. एम. जे लुबाळ, प्रा. डॉ. जी. एस. जाधव यांचे विशेष मार्गर्शन लाभले आहे. यशस्वी विद्यार्थ्यांचे विद्यालयाचे प्राचार्य डॉ. बी. टी. जाधव, उपप्राचार्य डॉ. बी. एस. बलवंत, सर्व शिक्षकांनी अभिनंदन केले.

दैनिक सकाळ दि. 17/09/2019

# जीवनात उच्च ध्येय बाळगून वाटचाल करा

## सागर देवकर; दहिवडीत महिला सुरक्षा कायदा साक्षरता व करिअरवर चर्चासत्र

**दहिवडी, ता. १६ :** ''जीवनात उच्च ध्येय बाळगून त्या दिशेने प्रयत्नशील राहा, यश नक्कीच पायाशी लोळण घेईल,'' असे प्रतिपादन प्रा. सागर देवकर यांनी केले.

दहिवडी कॉलेज येथे लैंगिक छळ प्रतिबंधक समिती व निर्भया पथक दहिवडी यांच्यातर्फे 'महिला सुरक्षा कायदा साक्षरता' व 'करिअर' या विषयावर आयोजित चर्चासत्रात ते बोलत होते. या वेळी सहायक पोलिस निरीक्षक राजकुमार भुजबळ, उपप्राचार्य प्रा. बी. एस. बलवंत, निर्भया पथकाचे सदस्य हवालदार तानाजी चंदनशिवे, नितीन सजगणे, स्नेहल पवार आदी मान्यवर उपस्थित होते.



**दहिवडी : विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना प्रा. सागर देवकर. या वेळी राजकुमार भुजबळ, बी. एस. बलवंत व विद्यार्थी.**

**(रूपेश कदम : सकाळ छायाचित्रसेवा)**

प्रा. देवकर म्हणाले, ''आपल्यातील कमतरतेवर मात करण्यासाठी सातत्यपूर्ण प्रयत्न आवश्यक आहेत. आयुष्यात काहीही अवघड नाही. फक्त तुमचे प्रयत्न प्रामाणिक पाहिजेत.''

भुजबळ म्हणाले, ''पौगंडावस्थेत आपल्या उज्ज्वल भविष्यासाठी प्रयत्न न करता नको ते करण्याकडे आजच्या तरुणांचे लक्ष आहे. या वयात योग्य निर्णय घेऊन योग्य दिशेने वाटचाल केली पाहिजे. सैराटच्या नादी लागण्यापेक्षा स्पर्धा परीक्षांच्या नादी लागा. महिला सुरक्षासंदर्भात अतिशय कडक कायदे करण्यात आले आहेत.

प्रा. डॉ. बलवंत म्हणाले, ''विद्यार्थ्यांना अभासी जगातून वास्तव जगाकडे परत नेणे ही काळाची गरज आहे. विद्यार्थ्यांनी जे आवडतं ते करण्यापेक्षा ज्याची आवश्यकता आहे ते करावे.''

चप्रा. यू. एस. मदने यांनी प्रास्ताविक केले. प्रा. डॉ. एस. बी. वाघमोडे यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. एम. एम. देठे यांनी आभार मानले.

दैनिक सकाळ दि. २२/०९/२०१९

# शब्दसंग्रह वाढवल्यास व्यक्तिमत्त्वाचा विकास

## प्रा. ए. एम. जाधव; दहिवडी महाविद्यालयामध्ये हिंदी दिन उत्साहात साजरा

**दहिवडी, ता. २२ :** ''आधुनिक माध्यमांचा विद्यार्थ्यांवर वाढता प्रभाव होत आहे. तसेच विद्यार्थ्यांनी प्रत्येक भाषेचा सन्मान करून राष्ट्रभाषेचाही सन्मान करणे गरजेचे आहे. विद्यार्थ्यांनी शब्दसंग्रह वाढवावा, त्याने व्यक्तिमत्त्वाला वेगळा आकार प्राप्त होतो, असे प्रतिपादन दहिवडी कॉलेज कनिष्ठ महाविद्यालयाचे प्रा. ए. एम. जाधव यांनी केले.

दहिवडी महाविद्यालयाच्या हिंदी विभाग व अग्रणी कॉलेज यांच्या वतीने दहिवडी महाविद्यालयात हिंदी दिन उत्साहात साजरा केला.




**दहिवडी : हिंदी दिनानिमित्त मनोगत व्यक्त करताना ए. एम. जाधव. व्यासपीठावर प्राध्यापक. (रूपेश कदम :** सकाळ छायाचित्रसेवा)

या वेळी दहिवडी कॉलेज कनिष्ठ महाविद्यालयाचे प्रा. ए. एम. जाधव प्रमुख पाहुणे होते.

जाधव म्हणाले, ''हिंदी भाषेचा वापर रोजच्या व्यवहारात करणे गरजेचे आहे. हिंदी भाषेची सीमा भारतापुरती मर्यादित नसून तिचे महत्त्व जागतिक पातळीवर दिवसेंदिवस वाढत आहे. एकविसाव्या शतकात हिंदी दिवस वेगळ्या पद्धतीने साजरा करण्याची आवश्यकता आहे.''

या समारंभात सेवानिवृत्त वाय. डी. भोज यांनी भारतीय स्वातंत्र्य चळवळीत हिंदी भाषेची भूमिका स्पष्ट करून राष्ट्रकविता सादर केल्या. मराठी विभागप्रमुख प्रा. मीरा देठे यांनी राष्ट्रभाषा ही भारतापुरती मर्यादित नसून, ती विश्वभाषा बनण्यासाठी सक्षम आहे.

हिंदी विभागप्रमुख प्रा. डॉ. बी. एस. बलवंत यांनी प्रास्ताविक केले. दीपाली खरात यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. डॉ. किशोर पवार यांनी आभार मानले. यावेळी बी.ए. भाग १,२, ३ चे विद्यार्थी उपस्थित होते.

दैनिक सकाळ दि. २३/०९/२०१९

# कर्मवीर जयंतीनिमित्त दहिवडीत शोभायात्रा

दहिवडी, ता. २३ : कर्मवीर भाऊराव पाटील यांची १३२ वी जयंती माण तालुक्यात मोठ्या जल्लोषात साजरी झाली. दहिवडी येथे रयत संकुलाच्या वतीने भव्य शोभायात्रा काढण्यात आली. माण तालुक्यात मोठ्या प्रमाणात रयत शिक्षण संस्थेच्या शाखा आहेत. या शाखांमध्ये कर्मवीर जयंती विविध उपक्रमांद्वारे साजरी करण्यात आली. दहिवडी येथे दहिवडी कॉलेज, महात्मा गांधी विद्यालय, प. म. शिंदे कन्या शाळा, रयत इंग्लिश मीडियम स्कूल यांनी एकत्रितपणे संपूर्ण शहरातून शोभायात्रा काढली.

या शोभायात्रेत झांज पथक, लेझीम पथक, गरबा नृत्य, टिपरी नृत्य सादर करण्यात आले, तसेच विविध महापुरुषांच्या वेशभूषा साकारण्यात आल्या होत्या. मलवडी येथे त्रिंबकराव काळे विद्यालयाने कर्मवीरांच्या प्रतिमेची मिरवणूक काढली. बस स्थानक परिसरात विद्यार्थ्यांनी विविध मनोरे साकारले, तसेच लेझीम व झांज पथकाचे उत्कृष्ट सादरीकरण केले.



**मलवडी : कर्मवीर जयंतीनिमित्त काढलेल्या मिरवणुकीत लेझीम सादर करताना विद्यार्थिनी.**

दैनिक सकाळ दि. ०२/१०/२०१८

# कर्मवीरांचे स्वप्न विद्यार्थी साकारतील : पाटील



दहिवडी : कर्मवीर जयंती सोहळ्यात बोलताना संजीव पाटील, समोर उपस्थित मान्यवर. (रूपेश कदम : सकाळ छायाचित्रसेवा)

**दहिवडी, ता. १ :** देश बलशाली बनविण्याचे कर्मवीरांचे स्वप्न येथील रयत संकुलाचे गुणवंत विद्यार्थी पूर्ण करतील याची मला खात्री आहे, असे प्रतिपादन रयतच्या मध्य विभागाचे चेअरमन संजीव पाटील यांनी केले.

कर्मवीर जयंती सोहळ्यात ते बोलत होते. या वेळी डॉ. रावसाहेब पाटील, नारायण माने, डॉ. प्रदीप शिंदे, माजी सभापती अतुल जाधव, माजी विद्यार्थी संघाचे अध्यक्ष नंदकुमार खोत, प्रा. आर. डी. जाधव उपस्थित होते. याप्रसंगी रयत शिक्षण संस्थेच्या शाखांना देणगी दिल्याबद्दल शिवाजी पाटणकर व आशालता पाटणकर, डॉ. नामदेव भोसले, डॉ. नितीन वाघमोडे, अजित पवार, युवराज ढगे, धीरजकुमार इंगळे यांचा सत्कार करण्यात आला. तसेच महविद्यालयातील विविध विभागात उल्लेखनीय कामगिरीबद्दल प्राध्यापक, यशस्वी विद्यार्थी व पालकांचा सत्कार करण्यात आला. प्राचार्य डॉ. बी. टी. जाधव यांनी प्रास्ताविक केले.

दैनिक लोकमत दि ०३/१०/२०१८



भांडवली, ता. माण येथील ओढ्यावर राष्ट्रीय सेवा योजनेतील विद्यार्थ्यांच्या श्रमदानातून बंधारा बांधण्यात आला. तो आता पूर्ण क्षमतेने भरला आहे.

# दुष्काळ निवारण्याच्या कामाचा भविष्यात फायदाच : शिंदे

लोकमत न्यूज नेटवर्क

**वरकुटे-मलवडी :** 'विद्यार्थ्यांनी पाच हजार रोपांचे वृक्षारोपण करुन डोंगरावरून वाहून जाणाऱ्या पाण्याची साठवण व्हावी, याकरिता श्रमदानातून दगड, मातीच्या बंधाऱ्याची निर्मिती केली. हे दुष्काळ निवारणासाठी केलेलं अतिशय चांगलं काम आहे. भविष्यात अशा कामाचा निश्चितच चांगला उपयोग होईल,' असे मत शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे यांनी व्यक्त केले.

दहिवडी येथील रयत शिक्षण संस्थेच्या दहिवडी कॉलेजमध्ये राष्ट्रीय सेवा योजनेंतर्गत विद्यार्थी-विद्यार्थिनींनी भांडवली गाव दत्तक घेतले. या गावात श्रमदानातून अनेक कामे झाली, त्याची कुलगुरुंनी पाहणी केली. यावेळी ते बोलत होते.

भांडवली, ता. माण येथील वृक्षारोपण व पाणी साठवण बंधारा या विद्यार्थ्यांच्या श्रमदानातून निर्माण झालेल्या कामास कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे यांनी सदिच्छा भेट दिली. यावेळी विविध मान्यवर उपस्थित होते.

# कर्मवीरांचे स्वप्न विद्यार्थी साकारतील : पाटील

लोकमत न्यूज नेटवर्क

**दहिवडी :** 'देश बलशाही बनविण्याचे कर्मवीरांचे स्वप्न येथील रयत संकुलाचे गुणवंत विद्यार्थी पूर्ण करतील, याची मला खात्री आहे,' असे प्रतिपादन 'रयत'च्या मध्य विभागाचे चेअरमन संजीव पाटील यांनी केले.

कर्मवीर जयंती सोहळ्यात ते बोलत होते. यावेळी डॉ. रावसाहेब पाटील, नारायण माने, डॉ. प्रदीप शिंदे, माजी सभापती अतुल जाधव, माजी विद्यार्थी संघाचे अध्यक्ष नंदकुमार खोत, प्रा. आर. डी. जाधव उपस्थित होते. याप्रसंगी रयत शिक्षण संस्थेच्या शाखांना देणगी दिल्याबद्दल शिवाजी पाटणकर, डॉ. नामदेव भोसले, डॉ. नितीन वाघमोडे, अजित पवार, युवराज ढगे, धीरजकुमार इंगळे यांचा सत्कार करण्यात आला. तसेच महाविद्यालयातील विविध विभागात उल्लेखनीय कामगिरीबद्दल प्राध्यापक, यशस्वी विद्यार्थी व पालकांचा सत्कार केला.

दैनिक सकाळ दि. ०३/१०/२०१९

# भांडवलीतील बंधाऱ्याची कुलगुरूंकडून पाहणी

सकाळ वृत्तसेवा

**दहिवडी, ता.२ :** रयत शिक्षण संस्थेच्या दहिवडी कॉलेज येथे राष्ट्रीय सेवा योजनेंतर्गत दत्तक गाव भांडवली (ता.माण) येथील वृक्षारोपण व पाणी साठवण बंधारा या कामास शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी भेट दिली. याप्रसंगी राष्ट्रीय सेवा योजनेचे विद्यापीठप्रमुख डॉ. डी. के. गायकवाड उपस्थित होते.

राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवक विद्यार्थी-विद्यार्थिनींनी श्रमदानाच्या माध्यमातून भांडवली गावानजीक डोंगरावर पाच हजार झाडांची लागवड केली आहे. त्याचबरोबर डोंगरावरून वाहून जाणारे पाणी साठवण व्हावे, यासाठी दगड व मातीचा भक्कम बंधारा बाधला आहे. या कामांची पाहणी केल्यानंतर कुलगुरू डॉ. शिंदे म्हणाले,''



**भांडवली : राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांनी केलेल्या जलसंधारणाच्या कामाची पाहणी करताना डॉ. देवानंद शिंदे, डॉ. बी. टी. जाधव आदी.** (रूपेश कदम : सकाळ छायाचित्रसेवा)

स्वयंसेवकांनी दुष्काळ निवारण्यासाठी केलेले काम चांगले आहे. वृक्षारोपण ही काळाची गरज असून, लावलेल्या रोपांची अतिशय उत्तम जोपासना केली आहे. भविष्यात या कामांचा निश्‍चित उपयोग होईल.''

या वेळी प्राचार्य डॉ. बी. टी. जाधव, प्रा. के. एस. शिंदे, प्रा. उदय शिंदे, प्रा. राहुल सूर्यवंशी, ग्रामस्थ, विद्यार्थी उपस्थित होते.

दैनिक सकाळ दि. १५/१०/२०१९

# दहिवडी कॉलेजमध्ये हिंदी विषयावर कार्यशाळा

**दहिवडी, ता. १४ :** ''कोणताही विषय शिकवताना रोजगार किती मिळतो ते पाहणे महत्त्वाचे आहे. विषय शिकवताना विषयासोबत व्यवहार, रोजगार, कौशल्य व मनोरंजन अशा पद्धतीने तो शिकवला, तरच शिकण्याची गोडी निर्माण होते,'' असे प्रतिपादन प्रा. डॉ. बी. टी. जाधव यांनी केले.

रयत शिक्षण संस्थेचे दहिवडी कॉलेज दहिवडी येथे शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर व शिवाजी विद्यापीठ हिंदी अध्ययन मंडळांतर्फे प्रयोजन मूलक हिंदी या बीए भाग दोन आयडीएस विषयाच्या बदलेल्या अभ्यासक्रमावरील एकदिवसीय कार्यशाळा आयोजन केली होती.

या वेळी बीजभाषण हिंदी अध्ययन मंडळ शिवाजी विद्यापीठ प्रा. डॉ. राजेंद्र भोसले यांनी केले. या कार्यशाळेचे उद्‌घाटन कला व वाणिज्य महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य. डॉ. क्षितीज धुमाळ यांनी केले.

प्रा. डॉ. सुनील बनसोडे यांनी अनुवाद, भाषांतर, विविध पत्रलेखन यांचा समावेश असेल, तर रोजगार निर्माण होतो हे सांगितले. डॉ. बबन सातपुते यांनी इलेक्ट्रॉनिक क्षेत्रातील हिंदीचा वाढता वापर हा रोजगारासाठी महत्त्वाचा आहे, असे सांगितले. या कार्यशाळेत प्रा. भारत खिलारे, डॉ. आगेडकर, डॉ. रमेश बोबडे आदी मान्यवरांनी मार्गदर्शन केले. उपप्राचार्य व हिंदी विभागप्रमुख डॉ. बी. एस. बळवंत यांनी प्रास्ताविक केले. डॉ. किशोर पवार यांनी सूत्रसंचालन केले.

दैनिक सकाळ दि. १५/१०/२०१९

# विद्यार्थ्यांनी सर्वांगीण विकास घडवावा : डॉ. ए. एन. दडस

## दहिवडी कॉलेजमध्ये विविध स्पर्धांचे आयोजन

**दहिवडी, ता. १४ :** ''कर्मवीर भाऊराव पाटील यांनी रयत शिक्षण संस्थेची स्थापना १०० वर्षांपूर्वी करून आज लाखो हाताना काम व विद्यार्थांना ज्ञानाचे बळ दिले, तसेच महाविद्यालयीन शिक्षण घेताना विद्यार्थ्यांनी आपल्या अंगी असणाऱ्या कलागुणांना मुक्त करून सर्वांगीण विकास घडवून आणावा,' असे प्रतिपादन डॉ. ए. एन. दडस यांनी केले.

रयत शिक्षण संस्थेच्या शताब्दी वर्षानिमित्त दहिवडी कॉलेजमध्ये विविध स्पर्धांचे आयोजन केले होते. त्या वेळी डॉ. ए. एन. दडस बोलत होते. महाविद्यालयाचे ज्युनियर विभागाचे पर्यवेक्षक प्रा. टी. एस. माने कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते. कार्यक्रम यशस्वितेसाठी प्राचार्य डॉ. बी. टी. जाधव, उपप्राचार्य डॉ. बी. एस. बळवंत यांनी मार्गदर्शन केले. प्रा. एम. बी. कुमठेकर यांनी प्रास्ताविक केले. प्रा. जी. बी. लोहार यांनी आभार मानले. प्रा. एन. व्ही. निकम यांनी सूत्रसंचालन केले. या वेळी शिक्षक, विद्यार्थी उपस्थित होते.

दैनिक सकाळ दि १८/१२/२०१८

सकाळ » TODAY

» अवतीभवती

# दहिवडी कॉलेजमध्ये उद्यापासून आंतरराष्ट्रीय आंतरविद्याशाखीय परिषद

**दहिवडी :** रयत शिक्षण संस्थेच्या दहिवडी कॉलेजमध्ये गुरुवारी व शुक्रवार (ता.२० डिसेंबर) दोन दिवशीय आंतरराष्ट्रीय आंतरविद्याशाखीय परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे. या परिषदेत मराठी, हिंदी, इंग्लिश या विषयातील धार्मिक, सामाजिक, आर्थिक, लिंग व जातीविषयक विषमतेचे चित्रण त्याबरोबरच सामाजिक शास्त्रे व व्यापारातील होणारे बदल अशा दोन विषयांवर आंतरराष्ट्रीय व राष्ट्रीय क्षेत्रातील मान्यवर चर्चा व मार्गदर्शन करणार आहेत. या परिषदेसाठी अमेरिकेचे डॉ. फ्रक्वाईस व्हिक्टर तोचन व डॉ. इझाबेल सी. ट्रूक, ओमानचे डॉ. हमीद के. अल बालुशी, इराणचे डॉ. पौरिया मलाही व डॉ. बेहजद पगहेह, तेहरानचे मोहम्मद आमिरी त्याबरोबर बांगलादेश, बेळगाव, गोवा, धारवाड येथील मार्गदर्शक आणि विविध विद्यापीठांतील अभ्यासक व संशोधक विद्यार्थी सहभागी होणार आहेत. सदर परिषदेसाठी प्राध्यापक व विद्यार्थी संशोधक यांनी उपस्थित राहण्याचे आवाहन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बी. टी. जाधव व उपप्राचार्य डॉ. बी. एस. बळवंत यांनी केले आहे.

दैनिक सकाळ दि १८/१२/२०१८

सकाळ » TODAY

» अवतीभवती


## दहिवडी कॉलेजमध्ये उद्यापासून आंतरराष्ट्रीय आंतरविद्याशाखीय परिषद

**दहिवडी :** रयत शिक्षण संस्थेच्या दहिवडी कॉलेजमध्ये गुरुवारी व शुक्रवार (ता.२० डिसेंबर) दोन दिवशीय आंतरराष्ट्रीय आंतरविद्याशाखीय परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे. या परिषदेत मराठी, हिंदी, इंग्लिश या विषयातील धार्मिक, सामाजिक, आर्थिक, लिंग व जातीविषयक विषमतेचे चित्रण त्याबरोबरच सामाजिक शास्त्रे व व्यापारातील होणारे बदल अशा दोन विषयांवर आंतरराष्ट्रीय व राष्ट्रीय क्षेत्रातील मान्यवर चर्चा व मार्गदर्शन करणार आहेत. या परिषदेसाठी अमेरिकेचे डॉ. फ्रक्वाईस व्हिक्टर तोचन व डॉ. इझाबेल सी. ट्रूक, ओमानचे डॉ. हमीद के. अल बालुशी, इराणचे डॉ. पौरिया मलाही व डॉ. बेहजद पगहेह, तेहरानचे मोहम्मद आमिरी त्याबरोबर बांगलादेश, बेळगाव, गोवा, धारवाड येथील मार्गदर्शक आणि विविध विद्यापीठांतील अभ्यासक व संशोधक विद्यार्थी सहभागी होणार आहेत. सदर परिषदेसाठी प्राध्यापक व विद्यार्थी संशोधक यांनी उपस्थित राहण्याचे आवाहन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बी. टी. जाधव व उपप्राचार्य डॉ. बी. एस. बळवंत यांनी केले आहे.

यावेळी पुढे बोलताना सा. गार

दै. तरुण भारत. रविवार दि. २८/१२/२०१८.

# दहिवडी कॉलेजमध्ये व्यवसाय मार्गदर्शन कार्यशाळा उत्साहात



**दहिवडी : कॉलेजमध्ये आयोजित कार्यशाळेत मार्गदर्शन करताना प्राचार्य डॉ. बी. टी. जाधव, व्यासपीठावर सुनील जाधव, डॉ. बी. एस. बळवंत, टी. एस. माने व इतर.**

प्रतिनिधी
म्हसवड

रयत शिक्षण संस्थेच्या शताब्दीनिमित्त दहिवडी कॉलेज, दहिवडीमध्ये ज्युनिअर कॉलेज वाणिज्य व व्यवसाय अभ्यासक्रमाच्यावतीने २३ व २४ डिसेंबर या दोन दिवशीय व्यवसाय मार्गदर्शन कार्यशाळेचे आयोजन डॉ. बी. टी. जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले होते. कार्यशाळेचे उद्घाटन सचिन जाधव यांच्या हस्ते दीपप्रज्वलन व प्रतिमपूजनाने करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बी. टी. जाधव होते.

कार्यक्रमास श्रीराम पतसंस्थेचे संस्थापक चेअरमन सुनील जाधव, डॉ. बी. एस. बळवंत, टी. एस. माने, व्ही. एस. मस्के, बी. एन. नरळे आदी उपस्थित होते. कार्यशाळेचा समारोप २४ डिसेंबर रोजी दुपारी तीन वाजता विनय पोळ व जयप्रकाश जाधव यांच्या मार्गदर्शनाने करण्यात आला.

कार्यशाळा चार सत्रामध्ये घेण्यात आली असून सचिन जाधव यांनी 'कौशल्य विकास काळाची गरज', वनराज कुमकर यांनी 'व्यक्तिमत्व विकासातून व्यावसायिक संधीकडे', तर कमलाकर महामुनी यांनी 'वाणिज्य व परकीय भाषा' व विनय पोळ यांनी 'कृषी क्षेत्रातील व्यवसायिक संधी', जयप्रकाश जाधव यांनी 'वाणिज्य क्षेत्रातील संधी', एन. डी. दबडे यांनी 'यशस्वी उद्योजक गुणवैशिष्टे' इत्यादी विषयांवर बहुमोल मार्गदर्शन केले.

कार्यशाळेतील विद्यार्थ्यांना प्रेरणा देण्यासाठी यशस्वी उद्योजक म्हणून श्रीराम उद्योग समूहचे सुनील जाधव, कोमल बॅग सेंटरचे सुनिता पवार, चैतन्य स्टीलचे सुधीर इनामदार, समर्थ ॲटोचे अनिल भोसले यांना निमंत्रित करण्यात आले होते. कार्यक्रमाचे प्रास्तविक व्ही. एस. मस्के यांनी केले, तर बी. एन. नरळे यांनी आभार मानले. एस. एम. पाटील व के. एम. कदम, बोराटे पी.बी. यांनी सूत्रसंचालन केले. कार्यशाळा यशस्वी करण्यासाठी यू. एम. पाटील, गुजले डी.पी., एन. बी. पुजारी, वाय. एम. शेडगे, एस.एच. माळवे, गाडे ए. एच., आर. बी. सूर्यवंशी व गणेश कुदळे यांच्यासह सभासदांनी विशेष परिश्रम घेतले.

दैनिक सकाळ दि. ३१/१२/२०१९

# दहिवडी कॉलेजात व्यवसाय मार्गदर्शन

## ज्युनियर कॉलेज वाणिज्य व व्यवसाय अभ्यासक्रम शाखेचा उपक्रम



दहिवडी : व्यवसाय मार्गदर्शन कार्यशाळेत बोलताना कमलाकर महामुनी. त्यावेळी उपस्थित मान्यवर व विद्यार्थी.
(रूपेश कदम : सकाळ छायाचित्रसेवा)

दहिवडी, ता. ३० : रयत शिक्षण संस्थेच्या शताब्दीनिमित्त दहिवडी कॉलेज दहिवडीत ज्युनिअर कॉलेज वाणिज्य व व्यवसाय अभ्यासक्रमाच्या वतीने दोनदिवसीय व्यवसाय मार्गदर्शन कार्यशाळा झाली.

कार्यशाळेचे उद्घाटन सातारा येथील कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता विभागाचे सहायक संचालक सचिन जाधव यांच्या हस्ते करण्यात आले. त्यांनी 'कौशल्य विकास काळाची गरज', वनराज कुमकर यांनी 'व्यक्तिमत्त्व विकासातून व्यावसायिक संधींकडे', 'रयत'चे विभागीय अधिकारी कमलाकर महामुनी यांनी 'वाणिज्य व परकीय भाषा', कल्याणी कृषी व सामाजिक विकास संस्थेचे अध्यक्ष विनय पोळ यांनी 'कृषी क्षेत्रातील व्यावसायिक संधी', जयप्रकाश जाधव यांनी 'वाणिज्य क्षेत्रातील संधी', एन. डी. दबडे यांनी 'यशस्वी उद्योजक गुणवैशिष्ट्ये' या विषयांवर मार्गदर्शन केले.

कार्यशाळेतील विद्यार्थ्यांना प्रेरणा देण्यासाठी यशस्वी उद्योजक म्हणून श्रीराम उद्योग समूहाचे संस्थापक सुनील जाधव, कोमल बँग सेंटर म्हसवडच्या सुनीता पवार, चैतन्य स्टील दहिवडीचे सुधीर इनामदार व समर्थ ॲटो दहिवडीचे अनिल भोसले यांना विशेष निमंत्रित करण्यात आले होते.


प्राचार्य डॉ. बी. टी. जाधव व उपप्राचार्य डॉ. बी. एस. बळवंत यांच्या मार्गदर्शनाखाली ही कार्यशाळा आयोजित करण्यात आली. प्रा. व्ही. एस. मस्के व प्रा. बी. एन. नरळे यांनी प्रास्ताविक केले. प्रा. पी. बी. बोराटे यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. एस. एम. पाटील व प्रा. के. एम. कदम यांनी आभार मानले. कार्यशाळा यशस्वी करण्यासाठी प्रा. यू. एम. पाटील, प्रा. डी. पी. गुजले, प्रा. एन. बी. पुजारी, प्रा. वाय. एम. शेडगे, प्रा. एस. एच. माळवे, प्रा. ए. एच. गाडे, प्रा. आर. बी. सूर्यवंशी व गणेश कुदळे यांनी परिश्रम घेतले.

दैनिक सकाळ दि. ३१/१२/२०१८

# दहिवडी कॉलेजात व्यवसाय मार्गदर्शन

## ज्युनियर कॉलेज वाणिज्य व व्यवसाय अभ्यासक्रम शाखेचा उपक्रम

**दहिवडी, ता. ३० :** रयत शिक्षण संस्थेच्या शताब्दीनिमित्त दहिवडी कॉलेज दहिवडीत ज्युनिअर कॉलेज वाणिज्य व व्यवसाय अभ्यासक्रमाच्या वतीने दोनदिवशीय व्यवसाय मार्गदर्शन कार्यशाळा झाली.



**दहिवडी : व्यवसाय मार्गदर्शन कार्यशाळेत बोलताना कमलाकर महामुनी. त्यावेळी उपस्थित मान्यवर व विद्यार्थी.**
(**रूपेश कदम :** सकाळ छायाचित्रसेवा)

कार्यशाळेचे उद्‌घाटन सातारा येथील कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता विभागाचे सहायक संचालक सचिन जाधव यांच्या हस्ते करण्यात आले. त्यांनी 'कौशल्य विकास काळाची गरज', वनराज कुमकर यांनी 'व्यक्तिमत्त्व विकासातून व्यावसायिक संधीकडे', 'रयत'चे विभागीय अधिकारी कमलाकर महामुनी यांनी 'वाणिज्य व परकीय भाषा', कल्याणी कृषी व सामाजिक विकास संस्थेचे अध्यक्ष विनय पोळ यांनी 'कृषी क्षेत्रातील व्यावसायिक संधी', जयप्रकाश जाधव यांनी 'वाणिज्य क्षेत्रातील संधी', एन. डी. दबडे यांनी 'यशस्वी उद्योजक गुणवैशिष्ट्ये' या विषयांवर मार्गदर्शन केले.

कार्यशाळेतील विद्यार्थ्यांना प्रेरणा देण्यासाठी यशस्वी उद्योजक म्हणून श्रीराम उद्योग समूहाचे संस्थापक सुनील जाधव, कोमल बॅग सेंटर म्हसवडच्या सुनीता पवार, चैतन्य स्टील दहिवडीचे सुधीर इनामदार व समर्थ ॲटो दहिवडीचे अनिल भोसले यांना विशेष निमंत्रित करण्यात आले होते.

प्राचार्य डॉ. बी. टी. जाधव व उपप्राचार्य डॉ. बी. एस. बळवंत यांच्या मार्गदर्शनाखाली ही कार्यशाळा आयोजित करण्यात आली. प्रा. व्ही. एस. मस्के व प्रा. बी. एन. नरळे यांनी प्रास्ताविक केले. प्रा. पी. बी. बोराटे यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. एस. एम. पाटील व प्रा. के. एम. कदम यांनी आभार मानले. कार्यशाळा यशस्वी करण्यासाठी प्रा. यू. एम. पाटील, प्रा. डी. पी. गुजले, प्रा. एन. बी. पुजारी, प्रा. वाय. एम. शेडगे, प्रा. एस. एच. माळवे, प्रा. ए. एच. गाडे, प्रा. आर. बी. सूर्यवंशी व गणेश कुदळे यांनी परिश्रम घेतले.

दि. 14 जानेवारी 2020, दै. सकाळ

# संशोधन अविष्कार स्पर्धेत दहिवडी कॉलेजचे यश

**दहिवडी, ता. १३ :** शिवाजी विद्यापीठ येथे झालेल्या संशोधन अविष्कार स्पर्धेत रयत शिक्षण संस्थेच्या दहिवडी कॉलेज दहिवडीने घवघवीत यश संपादन केले.

दरवर्षी शिवाजी विद्यापीठामध्ये संशोधन अविष्कार स्पर्धेचे आयोजन केले जाते. या स्पर्धेत शिवाजी विद्यापीठांतर्गत सर्व महाविद्यालये सहभागी होतात. या वर्षी दहिवडी कॉलेजमधील विद्यार्थी व शिक्षक यांनी या स्पर्धेत सहभाग घेवून तब्बल सात बक्षिसे मिळविली.

शुभांगी शिंदे हिने पदवी विभागात द्वितीय क्रमांक, तर सोमनाथ रोकडे याने पदव्युत्तर विभागात प्रथम क्रमांक मिळवला. प्रा. माधुरी देशमुख यांनी कला व मानव्यविद्या विभागात द्वितीय क्रमांक मिळवला. वाणिज्य विभागात प्रा. अश्विनी कांबळे यांनी व्दितीय क्रमांक, तर प्रा. सीमा जोशी यांनी तृतीय क्रमांक मिळवला. विज्ञान विभागात प्रा. प्रियांका पाटील यांनी प्रथम क्रमांक, तर प्रा. रेश्मा खांडेकर यांनी व्दितीय क्रमांक मिळवला.

संशोधन अविष्कार स्पर्धेत सहभागी विद्यार्थी व शिक्षकांना महाविद्यालयातील प्रा. डॉ. अनिल जगताप आणि प्रा. डॉ. अनिल चोपडे यांचे मार्गदर्शन लाभले. या सर्व यशस्वी विद्यार्थी व शिक्षकांचे महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बी. टी. जाधव, उपप्राचार्य डॉ. बी. एस. बळवंत आणि सर्व शिक्षकांनी अभिनंदन केले.

दि. १६ जानेवारी २०२०, दै. सकाळ

# विद्यार्थ्यांनी नेतृत्वगुणाचा विकास करावा

## प्राचार्य आर. एस. मोरे; दहिवडी कॉलेजचे सेवा योजना शिबिर भांडवलीत सुरू

दहिवडी, ता. १५ : विशेष श्रमसंस्कार शिबिराच्या माध्यमातून विद्यार्थ्यांनी आपल्या नेतृत्व गुणांचा विकास करण्याचा प्रयत्न करावा, असे प्रतिपादन सावळजच्या आर. आर. पाटील महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर. एस. मोरे यांनी केले.

शिवाजी विद्यापीठ, शिक्षण उपसंचालक कार्यालय कोल्हापूर व दहिवडी कॉलेज यांच्या वतीने राष्ट्रीय सेवा योजनेचे विशेष श्रमसंस्कार शिबिर भांडवली येथे होत आहे. त्याच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते.

या वेळी प्राचार्य डॉ. बी. टी. जाधव, उपप्राचार्य डॉ. बी. एस. बलवंत, सरपंच बालिका सूर्यवंशी, पर्यवेक्षक प्रा. टी. एस. माने, प्रा. डॉ. अनिल दडस आदी मान्यवर उपस्थित होते.

प्राचार्य डॉ. मोरे म्हणाले, ''या शिबिरात गावातील प्रश्न समजावून घेऊन त्या प्रश्नांची उकल करावी. विविध कार्यक्रमात ग्रामस्थांचा जास्तीतजास्त सहभाग घ्यावा. जेणेकरून मोठे व चांगले काम उभं राहील. या शिबिरात संस्कार होतात व शिस्त लागते. काम कसं करून घ्यायचं हे येथे शिकता.''

प्राचार्य डॉ. जाधव म्हणाले, ''भांडवली या गावाकडून विद्यार्थ्यांना शिकण्यासारखं खूप आहे. गावाची एकी, श्रमसंस्कार, जलसंधारणाची केलेली कामे हे सगळं आदर्शवत आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांनी ग्रामस्थांशी सुसंवाद साधून या भागाची परिपूर्ण माहिती घ्यावी. शिबिराच्या माध्यमातून सर्वांगीण विकास साधावा.'' कार्यक्रम अधिकारी प्रा. के. एस. शिंदे यांनी प्रास्ताविक केले. तर प्रा. जी. बी. लोहार यांनी शिबिरातील कार्यक्रमांची रूपरेशा समजावून सांगितली.

कार्यक्रमास बाळासाहेब गोसावी, सुधीर सूर्यवंशी, दत्तात्रय बारसवडे, विक्रम सूर्यवंशी, रवी खरात, नाना सूर्यवंशी, अन्सार मुलाणी, गजानन देवकर, किरण सपकाळ, मनीषा सूर्यवंशी, महावीर खरात, गणेश सूर्यवंशी आदी ग्रामस्थ उपस्थित होते. प्रा. विजय पाटोळे यांनी सूत्रसंचालन केले, तर कार्यक्रम अधिकारी प्रा. एम. बी. शिकलगार यांनी आभार मानले.




**भांडवली (ता. माण) : दहिवडी कॉलेजच्या विशेष श्रमसंस्कार शिबिराच्या उद्घाटनप्रसंगी विविध मान्यवर.**
**(रूपेश कदम : सकाळ छायाचित्रसेवा)**

लोकमत, २ फेब्रुवारी २०२०

दैनिक लोकमत दि. २ फेब्रुवारी २०२०



संडे Motivation

# भांडवलीत पाणीदार चळवळ बळकट

## श्रमसंस्कार शिबिर । दहिवडीच्या विद्यार्थ्यांकडून सात दिवस श्रमदान

नवनाथ जगदाळे।
लोकमत न्यूज नेटवर्क

दहिवडी : राष्ट्रीय सेवा योजनेच्या श्रमसंस्कार शिबिरातून नवनेतृत्व घडते. विद्यार्थ्यांच्या विचारांना दिशा मिळते. गावांत बदल होतात. अशाच प्रकारे दहिवडी कॉलेजच्या विद्यार्थ्यांनी पाणीदार भांडवलीत शिबिर घेऊन दगडी बांध बांधून पाणीदार चळवळ आणखी बळकट केली. तसेच यावेळी गावात समाजप्रबोधनही करण्यात आले.

माण तालुक्यातील भांडवली गाव. माण तालुक्याचे मुख्यालय असणाऱ्या दहिवडीपासून १५ किलोमीटर अंतरावर आहे. हे गाव पाणीदार झाले आहे. दोन वर्षांपूर्वी वॉटर कप स्पर्धेत गावाने राज्यात द्वितीय क्रमांक मिळविलेला. याच गावात दहिवडी कॉलेजचे राष्ट्रीय सेवा योजनेचे विशेष श्रमसंस्कार शिबिर दुसऱ्या वर्षीही झाले.

कॉलेजमधील जवळपास १२५ विद्यार्थी शिबिरात सहभागी झाले होते. सात दिवस गावांत विविध कार्यक्रम झाले. या विद्यार्थ्यांसाठी गावाने मुक्कामाची सोय केली होती. या विद्यार्थ्यांनी गाव परिसरात पाहणी केली. तसेच माळरानावर वृक्षारोपण केलेल्या ठिकाणी गवत काढणे, मल्चिंगचे काम केले. त्यामुळे झाडे वाढीस मदत होणार आहे. तसेच या विद्यार्थ्यांनी गावात समाजप्रबोधन केले. प्लास्टिकमुक्ती, स्वच्छता यावर भर दिला. तसेच पाण्याचे महत्त्वही समजावून सांगितले, त्यामुळे गावात आणखी जनजागृती झाली.

### डोंगर उतारावर ५० दगडी बांध बांधले...

भांडवली गावाच्या भोवती डोंगर आहेत. त्यामुळे गावाला निसर्गदत्त देणगीच मिळालीय. या डोंगर आणि माळरान परिसरात ग्रामस्थांनी हजारो झाडे लावली आहेत. या झाडांसाठीही विद्यार्थ्यांनी योगदान दिले. तसेच या डोंगर उतारावर दहिवडी कॉलेजच्या विद्यार्थ्यांनी जवळपास ५० दगडी बांध बांधलेत. त्यामुळे पावसाळ्यात वेगाने येणारे पाणी व माती अडण्यास मदत होईल. तसेच पाणी थांबणार आहे. अशाप्रकारे या विद्यार्थ्यांनी काम केले. यासाठी भांडवलीचे उपसरपंच सुनील सूर्यवंशी यांच्यासह ग्रामस्थांची मोठी मदत झाली. तसेच कॉलेजचे प्राचार्य डॉ. बी. टी. जाधव, प्रा. के. एस. शिंदे, प्रा. जी. बी. लोहार आणि प्रा. डी. पी. गुजले यांनीही योगदान दिले.



> दहिवडी कॉलेजच्या मुलांनी भांडवलीत विशेष श्रमसंस्कार शिबिरात मोठे काम केले आहे. त्यांचे योगदान सलग दुसऱ्यावर्षी राहिले आहे. यावर्षी डोंगर उतारावर दगडी बांध निर्माण करण्यात आले आहेत.
>
> \- सुनील सूर्यवंशी, उपसरपंच भांडवली

> सामाजिक कार्याची आवड व्हावी, गुणांचा विकास व्हावा यासाठी भांडवलीत श्रमदान शिबिर झाले. विद्यार्थ्यांनी या ठिकाणी श्रमदानाचे मोठे काम केले. ग्रामस्थांचेही सहकार्य मिळाले.
>
> \- प्रा. के एस. शिंदे, दहिवडी कॉलेज

दैनिक सकाळ, 14 फेब्रुवारी २

# दहिवडी कॉलेजमध्ये उद्या पारितोषिक वितरण

**दहिवडी, ता. १३ :** येथील दहिवडी कॉलेजचा वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ शनिवारी (ता. १५) सकाळी १० वाजता आयोजित करण्यात आला आहे. या कार्यक्रमास पंढरपूरच्या कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अशोकराव भोईटे प्रमुख पाहुणे म्हणून, तर प्रमुख मार्गदर्शक म्हणून पैलवान भारत मस्के उपस्थित राहणार आहेत. या वेळी महाविद्यालय विकास समितीचे सदस्य प्रभाकर देशमुख, वाघोजीराव पोळ, नारायणराव माने, चेतना सिन्हा, सुनील जाधव यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे.

या समारंभात राष्ट्रीय, राज्य व विद्यापीठ पातळीवरील यशस्वी खेळाडू, युवा महोत्सवात विशेष प्रावीण्य मिळवलेले कलाकार विद्यार्थी, पीएचडी प्राप्त शिक्षक, गुणवंत शिक्षक व सेवक अशांचा सन्मान होणार आहे. या कार्यक्रमास

# ट्रेड फेअरमधून होतील नवउद्योजक

## सागर घोरपडे; दहिवडी कॉलेजमध्ये उपक्रमाचे उद्‌घाटन

दहिवडी, ता. १४ : उद्योग छोटा असो वा मोठा तो सुरू करणे महत्त्वाचे असते. ट्रेड फेअर उपक्रमातून नव उद्योजक निर्माण होतील, असे प्रतिपादन श्री ॲग्रो इंडस्ट्रीजचे व्यवस्थापकीय संचालक सागर घोरपडे यांनी केले.

दहिवडी कॉलेजमध्ये वाणिज्य विभागाच्या वतीने आयोजित 'ट्रेड फेअर २०२०' या उपक्रमाच्या उद्‌घाटनप्रसंगी ते बोलत होते. या वेळी सहायक पोलिस निरीक्षक राजकुमार भुजबळ, ड्रीम सोशल फाउंडेशनच्या अनुराधा देशमुख, माजी विद्यार्थी संघाचे अध्यक्ष नंदकुमार खोत, प्राचार्य डॉ. बी. टी. जाधव, बँक ऑफ महाराष्ट्रचे शाखाप्रमुख एल. आर. जगदाळे, प्राचार्य डॉ. बी. एस. खाडे, उपप्राचार्य बी. एस. बलवंत, उपसरपंच मंदाकिनी कदम, प्रा. टी. एस. माने, विशाल कोकरे आदी उपस्थित होते.

### विविध खाद्यपदार्थांचे स्टॉल

ट्रेड फेअर २०२० मध्ये १५० विद्यार्थ्यांनी विविध खाद्यपदार्थांचे १४ स्टॉल लावले आहेत. यात सेंद्रिय काकडी, बास्केट चाट, भेळ, पावभाजी, व्हेज राईस, चीज सँडविच, पॅटीस, दम बिर्याणी, पाणी पुरी, व्हेज मंचुरियन, पास्ता, भेळपुरी, कटलेट, चिकन ६५, कटलेट, मिल्क शेक, लिंबू सरबत आदी लज्जतदार खाद्य पदार्थ ठेवण्यात आले आहेत.

श्री घोरपडे म्हणाले, "आजच्या अनुभवातूनच विद्यार्थ्यांना उद्योग उभारणीची जाणीव होईल. व्यवसायामध्ये गुणवत्ता, विक्री व आपले नाव तयार करणे महत्त्वाचे असते. या उपक्रमाकडे गंमतजंमत म्हणून न पाहता अनुभव समृद्ध होण्याची संधी म्हणून पाहा."

श्री. भुजबळ म्हणाले, "उद्योजक बनण्याची पहिली पायरी म्हणजे आजचा ट्रेड फेअर आहे, असे मला वाटते. यातूनच शिकून, अनुभव घेऊन विद्यार्थी चांगला व्यवसाय करण्यास शिकतील."

अनुराधा देशमुख, प्राचार्य डॉ. जाधव यांचे भाषण झाले. या वेळी ट्रेड फेअरमधील अनुभव घेऊन उद्योजक बनलेला कॉलेजचा माजी विद्यार्थी विशाल कोकरे याचा सत्कार करण्यात आला. प्रा. एम. बी. शिकलगार यांनी प्रास्ताविक केले. प्रा. ए. टी. कांबळे यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. एन. डी. दबडे यांनी आभार मानले.



दहिवडी : दहिवडी कॉलेजमध्ये ट्रेड फेअरचे उद्‌घाटन करताना बी. टी. जाधव. त्या वेळी सागर घोरपडे, राजकुमार भुजबळ आदी.
(रुपेश कदम : सकाळ छायाचित्रसेवा)

दि. 15 फेब्रुवारी 2020

# सहज सुलभ प्रक्रियेतून साहित्याची करा समीक्षा

## प्रा. डॉ. जठार; दहिवडी कॉलेजमध्ये कार्यशाळा

**दहिवडी, ता. १४ :** समीक्षा म्हणजे एखाद्या गोष्टीवर आपले मत व्यक्त करता येते. साहित्य समीक्षा ही सहज सुलभ प्रक्रिया आहे. असे मत प्रा. डॉ. लक्ष्मण जठार यांनी व्यक्त केले.

दहिवडी कॉलेजमधील इंग्रजी विभाग व अग्रणी महाविद्यालय योजनेंतर्गत एक दिवसीय कार्यशाळेत ते बोलत होते. प्रा. डॉ. जठार म्हणाले, "दैनंदिन जीवनात आपण छोट्या-छोट्या गोष्टींची समीक्षा करतो; पण महाविद्यालयात शिक्षण घेताना साहित्य समीक्षा करताना ती अवघड प्रक्रिया आहे, असे वाटते.'' प्रा. डॉ. शिवकुमार अग्रवाल यांनी 'लेखन, वाचन, चिंतन, भाषण या कौशल्यांसोबत आकलन हे महत्त्वाचे कौशल्य असल्याचे नमूद केले. इंग्रजी विभागप्रमुख प्रा. डॉ. अनिल दडस यांनी साहित्य समजावून घेतले, की समीक्षा करणे सोपे जाते, असे सांगितले. उपप्राचार्य डॉ. बी. एस. बलवंत यांनीही मार्गदर्शन केले.

या कार्यशाळेस प्रा. डॉ. एस. एम. खेत्रे, प्रा. सीमा दडस, प्रा. सी. बी. देसाई व इंग्रजी विषयाचे विद्यार्थी उपस्थित होते. प्रा. उज्वला मदने यांनी प्रास्ताविक केले. प्रा. डॉ. कुशल राऊत यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. डॉ. एन. डी. लोखंडे यांनी आभार मानले.

दैनिक सकाळ, 25 फेब्रुवारी 2020

# माणदेश फाउंडेशनचे कार्य कौतुकास्पद

## डॉ. नितीन वाघमोडे; रयत संकुलाला पिण्याच्या पाण्यासाठी लाखाचा धनादेश

**दहिवडी, ता. २४ :** माणदेश फाउंडेशनचे कार्य कौतुकास्पद असून, त्यांचे समाजासाठी असलेले योगदान उल्लेखनीय आहे, असे प्रतिपादन अतिरिक्त आयकर आयुक्त डॉ. नितीन वाघमोडे यांनी केले.

माणदेश फाउंडेशन पुणे यांच्या वतीने येथील रयत संकुलाला पिण्याच्या पाण्यासाठी एक लाख रुपयांचा धनादेश देण्यात आला. त्या वेळी ते बोलत होते. या वेळी मोटार वाहन निरीक्षक गजानन ठोंबरे, नगरसेवक अजित पवार, प्रा. डॉ. मारुती लुबाळ, सागर जाधव, विक्रम शिंगाडे, शहाजी बनगर, प्राचार्य बबन खाडे, पर्यवेक्षक रेखा जाधव आदी मान्यवर उपस्थित होते.



**दहिवडी : माणदेश फाउंडेशन पुणेच्या वतीने रयत संकुलास एक लाखाचा धनादेश देताना डॉ. नितीन वाघमोडे, गजानन ठोंबरे व मान्यवर.**

(**रुपेश कदम :** सकाळ छायाचित्रसेवा)

डॉ. वाघमोडे म्हणाले, "येथील रयत संकुल सर्वच क्षेत्रात अग्रेसर आहे. या संकुलातील विद्यार्थ्यांनी आपल्या कर्तृत्वाचा ठसा आंतरराष्ट्रीय स्तरावर उमटविला आहे. त्यामुळे या संकुलाला मदत करण्यासाठी अनेक जण पुढे येत आहेत. माणदेश फाउंडेशनने मदतीसाठी पुढे केलेला हात हे त्याचेच द्योतक आहे. माणदेश फाउंडेशन नेहमीच विद्यार्थी व शिक्षणासाठी विविध उपक्रम राबवीत असते."

श्री. ठोंबरे म्हणाले, "विद्यार्थ्यांनी शालेय जीवनातच योग्य ध्येय निश्चित करून त्या दिशेने मार्गक्रमण करावे. कोणताही एखादा छंद जोपासून जीवनाचा आनंद घ्यावा." श्री. पवार म्हणाले, "माणदेश फाउंडेशनसारख्या दानशूर संस्था व व्यक्तींमुळे रयत संकुलाला चांगलं रूप येऊ लागले आहे. या संकुलाचा पाणीप्रश्न लवकरच संपणार असून, सर्वच विद्यार्थ्यांना शुद्ध व मुबलक पाणी मिळणार आहे." मुख्याध्यापक बबन खाडे यांनी प्रास्ताविक केले. ज्ञानेश काळे यांनी सूत्रसंचालन केले. ए. बी. शेख यांनी आभार मानले.

दैनिक सकाळ, 25 फेब्रुवारी 2020.

# दहिवडीतील विद्यार्थ्यांनी जपली माणुसकी!

## वाणिज्य जत्रेतून मिळालेल्या नफ्यातून अस्थिव्यंग मुलांच्या निवासी शाळेत फळांचे वाटप



**दहिवडी : अस्थिव्यंग मुलांच्या शाळेतील मुलांना खाऊवाटप करताना दहिवडी कॉलेजचे विद्यार्थी व प्राध्यापक.**

(**रूपेश कदम :** सकाळ छायाचित्रसेवा)

> **सामाजिक बांधीलकीच्या भावनेतून मिळालेल्या नफ्यातून आम्ही त्या मुलांच्या चेहऱ्यावर आनंद आणण्याचा प्रयत्न केला. महाविद्यालयाने दिलेल्या संधीमुळे आम्ही ही मदत करू शकलो.**
> -तेजस पवार, गटप्रमुख, सिब्लींग्ज कट्टा

**दहिवडी, ता. २४ :** आजची तरुणाई, विशेषतः महाविद्यालयीन विद्यार्थी बेभान, बेफिकीर असल्याचे बोलले जाते. पण, या समजाला छेद देणारी कृती विद्यार्थ्यांकडून केली जाते व अजूनही विद्यार्थ्यांकडून माणुसकी जपली जातेय, याचा प्रत्यय दहिवडीत आला. या महाविद्यालयातील तरुणांनी विक्रीतून मिळालेल्या फायद्यातून निवासी शाळेतील मुलांना फळांचे वाटप केले.

दहिवडी कॉलेज दहिवडीच्या वाणिज्य विभागाने 'वाणिज्य जत्रा' आयोजित केली होती. त्यात १६० विद्यार्थी सहभागी झाले होते. त्यातील 'सिब्लींग्ज कट्टा' या गटात गटप्रमुख तेजस पवार याच्यासह महेश खाडे, जीवन जगदाळे, सुमित कलढोणे, प्रकाश जाधव, कोमल पोळ, रूपाली सजगणे, निकिता ठोंबरे, अंकिता जगदाळे, ऋतुजा जाधव, पूजा चोपडे व किरण खाडे यांचा समावेश होता. त्यांनी चिकन बिर्याणी, मावा कुल्फी, चॉकलेट पान व इडली सांबर हे पदार्थ विक्रीस ठेवले होते. या खाद्यपदार्थांना खवैय्यांनी भरभरून प्रतिसाद दिल्याने जबरदस्त विक्री झाली. फक्त पाच ते सहा तासांत एकवीस हजार रुपयांची विक्री झाली. १४ हजारांचा खर्च वजा जाता सात हजार रुपयांचा फायदा झाला होता.

एवढा फायदा झाल्यामुळे आनंदी झालेल्या विद्यार्थ्यांनी या रकमेचा वापर स्वतःसाठी करण्यासोबतच समाजासाठी करावा, असा विचार चर्चेतून पुढे आले.

या रकमेतून निवासी शाळेतील अस्थिव्यंग मुलांसाठी केळी, सफरचंदासह विविध फळांचे वाटप करण्यात आले. 'महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांना मिळालेल्या संधीचे सोने करत त्यांनी व्यावसायिक ज्ञान घेवून नफा कमवलाच, पण त्या नफ्यातून सामाजिक बांधिलकीही जपली याचा मनस्वी आनंद आहे, असे प्राचार्य डॉ. बी. टी. जाधव यांनी सांगितले. उपप्राचार्य डॉ. बी. एस. बलवंत, वाणिज्य विभागप्रमुख प्रा. एम. बी. शिकलगार, प्रा. एन. डी. दबडे, प्रा. ए. टी. कांबळे, प्रा. एम. एन. म्हेत्रे, प्रा. एस. एस. जोशी, प्रा. जी. डी. ठोंबरे व प्रा. के. एस. शिंदे यांच्या उपस्थितीत या खाद्यपदार्थांचे वाटप करण्यात आले.

पुढारी - २९ फेब्रुवारी २०२०

संक्षिप्त



विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना अजित काटकर.

# मातृभाषेतून शिक्षणाला प्राधान्य द्यावे : अजित काटकर

**दहिवडी (पुढारी वृत्तसेवा) :** ज्या भाषेतून मुलांच्या भावनिक जाणीवा विकसित होत असतात, ज्या भाषेतून मूल पहिल्यांदा विचार करण्याचे कौशल्य आत्मसात करण्याचा प्रयत्न करते, ती त्याची मातृभाषा असते. मातृभाषा व संस्कृती यांचे शिक्षणात असलेले स्थान ओळखून मातृभाषेतून शिक्षणाला प्राधान्य द्यावे, असे प्रतिपादन अजित काटकर यांनी केले. दहिवडी कॉलेज येथे जागतिक मराठी दिनानिमित्ताने आयोजित कार्यक्रम प्रसंगी बोलताना काटकर म्हणाले, भाषा आणि संस्कृती यांचे अतूट नाते असते. आपली संस्कृती टिकवायची असेल तर मातृभाषा महत्वाची आहे. भाषा हे केवळ संवादाचे माध्यम नाही तर ते लोकजीवनाचे माध्यम आहे. दरम्यान, किशोर खरात या विद्यार्थ्याने कवितावाचन केले. यावेळी उपप्राचार्य डॉ. बलवंत, प्रा. देठे, डॉ. वाघमोडे, प्रा. मदने उपस्थित होत्या. प्रास्तविक व सूत्रसंचलन डॉ. एस. बी. वाघमोडे यांनी केले.

दैनिक सकाळ, ५ मार्च २०२०

# विद्यार्थ्यांनी विविध कौशल्ये अंगीकारावीत

## रयतचे कार्याध्यक्ष डॉ. अनिल पाटील यांचे प्रतिपादन; दहिवडीमध्ये पदवी प्रदान समारंभ

दहिवडी, ता. ३ : विद्यार्थ्यांनी परंपरागत शिक्षणासोबतच विविध कौशल्ये अंगीकारली पाहिजेत. काळानुसार जे बदलतील ते टिकतील. बाकीचे संपतील, असे प्रतिपादन रयत शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष डॉ. अनिल पाटील यांनी केले.

दहिवडी कॉलेजमध्ये आयोजित शिवाजी विद्यापीठ पदवी प्रदान समारंभप्रसंगी डॉ. पाटील बोलत होते. या वेळी शिवाजी विद्यापीठाच्या ॲकॅडमिक कौन्सिल सदस्य डॉ. सारंग भोला, महाविद्यालय विकास समितीचे सुनील जाधव, प्राचार्य डॉ. बी. टी. जाधव, नारायणराव माने, विद्यार्थी विकास समितीचे प्रा. पी. के. टोणे, विद्यार्थी साहाय्यता समितीचे डॉ. एम. जे. लुबाळ, उपप्राचार्य डॉ. बी. एस. बलवंत, प्रा. आर. डी. जाधव, माजी विद्यार्थी संघाचे अध्यक्ष नंदकुमार खोत आदी उपस्थित होते.

डॉ. पाटील म्हणाले, "आयुष्यातील एक लढाई संपून दुसरी लढाई सुरू होत आहे. जागतिकीकरणाचे स्वातंत्र्य घेऊन जन्माला आलेली ही आजची पिढी आहे. विद्यार्थ्यांना आजचे वास्तव काय, आपल्या ताटात काय वाढून ठेवलेय हे पाहावे लागेल. शिक्षण क्षेत्रात पूर्वापार आलेल्या पद्धतीत काडीचाही बदल झालेला नाही. यापुढे सर्वच क्षेत्रात बदल होणार आहेत. ते बदल स्वीकारावेच लागतील."



दहिवडी : दहिवडी कॉलेज येथे पदवीप्रदान समारंभानिमित्त मान्यवरांच्या उपस्थितीत संचलन करण्यात आले. (रूपेश कदम : सकाळ छायाचित्रसेवा)

प्राचार्य डॉ. जाधव म्हणाले, "आजचा दिवस महाविद्यालय व विद्यार्थ्यांसाठी आनंददायी आहे. आयुष्यात पुढे जाताना शिक्षण व नोकरीचा संबंध लावू नका. स्वतःची कौशल्य विकसित करण्याचा प्रयत्न करा. विद्यार्थ्यांकडे चांगले संवाद, लेखन, वाचन कौशल्य पाहिजे."

डॉ. भोला म्हणाले, "आजपर्यंत जे शिक्षण घेतले. त्यावर या पदवीदान समारंभात मोहर उमटवली जाते. ही पदवी नसून एका मोठ्या जबाबदारीची जाणीव आहे. घेतलेल्या शिक्षणाचा समाजाला फायदा करून द्यायचा आहे." विद्यार्थ्यांनी उत्तुंग ध्येय ठेवून त्या दिशेने वाटचाल करावी, अशी अपेक्षा सुनील जाधव यांनी व्यक्त केली. परीक्षाप्रमुख डॉ. के. एम. पवार यांनी प्रास्ताविक केले. एन. डी. लोखंडे व एस. बी. माने यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. एम. जे. लुबाळ यांनी आभार मानले.

दैनिक सकाळ, ७ मार्च २०२०

# स्वातंत्र्याचा आनंद घ्या, पण स्वैराचारी होऊ नका!

## तेजस्वी सातपुते; दहिवडी कॉलेजमधील महिला सुसंवाद मेळाव्यास उत्स्फूर्त प्रतिसाद

**दहिवडी, ता. ६ : स्वातंत्र्याचा आनंद घ्या, पण स्वैराचारी होऊ नका, असा सल्ला देतानाच अन्याय सहन करू नका, कारण अन्याय करणाऱ्यापेक्षा अन्याय सहन करणारा दोषी असतो, असे स्पष्ट प्रतिपादन पोलिस अधीक्षक तेजस्वी सातपुते यांनी केले.**

दहिवडी कॉलेजात आयोजित महिला सुसंवाद मेळाव्यात त्या बोलत होत्या. यावेळी पोलिस उपअधीक्षक बी. बी. महामुनी, पोलिस निरीक्षक अशोक पाटील, सहायक पोलिस निरीक्षक राजकुमार भुजबळ, सहायक पोलिस निरीक्षक यू. एस. भापकर, पोलिस उपनिरीक्षक शहाजी गोसावी, उपप्राचार्य बी. एस. बलवंत आदी मान्यवर उपस्थित होते. सातपुते म्हणाल्या, "एखादी दुर्दैवी घटना घडल्यानंतरच आपण जागं व्हायचं का? आपण नेहमी सजग राहण्याची गरज आहे. त्यासाठी मी विद्यार्थिनींशी महिला सुरक्षेवर चर्चा करत आहे. मुलींनी पहिल्यांदा घडणाऱ्या चुकीच्या गोष्टीला विरोध केला पाहिजे. आपण सहन करतो म्हणून विकृती वाढते. अनेकदा मैत्रिणीच मैत्रिणीला भरीस घालतात व तिचे आयुष्य उद्ध्वस्त करतात. आपल्या मैत्रिणीला सावरणे ही खरी मैत्री आहे. महिला सर्व प्रकारच्या कष्टाची, बुद्धीची कामे करतात; पण स्वतःच्या आरोग्याची हेळसांड करतात. आपण किमान खाद्यसंस्कृतीची समता आणणे आवश्यक आहे. महिलांनी समतोल आहार घेणे व व्यायाम करणे महत्त्वाचे आहे. खुप त्याग व बलिदानानंतर मुलींना शिक्षणाची संधी मिळाली आहे. त्यामुळे ही संधी शुल्लक कारणांसाठी गमावू नका." समाजात असलेल्या ५० टक्के महिलांची सुधारणा म्हणजे समाजाची सुधारणा होय. त्यामुळे महिला सुधारणा अत्यंत महत्त्वाची आहे, असेही त्या म्हणाल्या. यावेळी त्यांनी उपस्थित विद्यार्थिनींच्या प्रश्नांना समर्पक उत्तरे दिली.



दहिवडी : दहिवडी कॉलेजच्या विद्यार्थिनींनी भरलेल्या सभागृहात मार्गदर्शन करताना तेजस्वी सातपुते. (रूपेश कदम : सकाळ छायाचित्रसेवा)

पोलिस उपअधीक्षक महामुनी म्हणाले, "महिलांच्या उन्नतीसाठी सातत्यपूर्ण प्रयत्नांची गरज आहे. माणदेशी महिलांनी अनेक क्षेत्रामध्ये उत्तुंग यश मिळवून आपल्या कर्तृत्वाचा ठसा उमटविला आहे." या वेळी प्रा. कविता म्हेत्रे यांनी सातपुते यांच्या व्यक्तिमत्त्व व वक्तृत्वाने प्रभावित होवून आमच्या महिलांनी त्यांच्यासारखे बनण्याची प्रेरणा घेतली आहे, असे सांगितले.

या वेळी विविध क्षेत्रात उल्लेखनीय काम केलेल्या प्रा. म्हेत्रे, भाग्यश्री भाग्यवंत, प्रा. उज्वला मदने, करिष्मा जाधव, वैष्णवी सावंत, ज्योत्स्ना जगदाळे, सुप्रिया देशपांडे, सीमा पुजारी, प्रतिमा कदम, बेबीताई जाधव, दीपाली भादुले, ऋतुजा कावडे या कर्तृत्ववान महिलांचा सत्कार करण्यात आला. प्रा. उज्वला मदने यांनी प्रास्ताविक केले.

प्रा. मीरा देठे यांनी सूत्रसंचालन केले. राजकुमार भुजबळ यांनी आभार मानले.

# माणदेशी २७ हिरो निघाले देशसेवेला

## दहिवडी कॉलेजातील एनसीसीचे यश; ॲकॅडमी न लावता मार्गदर्शनाच्या बळावर भरती

**रूपेश कदम : सकाळ वृत्तसेवा**

दहिवडी, ता. १३ : दहिवडी कॉलेज दहिवडीच्या राष्ट्रीय छात्र सेनेच्या तब्बल २७ विद्यार्थ्यांनी एकाच वेळी भारतीय सेनेत भरती होऊन नवा उच्चांक केला आहे.

दहिवडी कॉलेजमधील छात्र सेना विभागात अतिशय कडक शिस्तीत ड्रील, धावणे, क्रॉसकंट्री यांसह विविध प्रशिक्षण दिले जाते. त्यामुळे विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास कमालीचा वाढतो, तसेच 'सी' प्रमाणपत्र मिळवले, तर भारतीय सेनेची लेखी परीक्षा देण्यापासून सूट मिळते. त्यामुळे छात्र सेनेत भरती होण्याकडे विद्यार्थ्यांचा कल असतो.



**दहिवडी : भारतीय सैन्य दलात एकाचवेळी भरती झालेले दहिवडी कॉलेज दहिवडीच्या छात्रसेना विभागातील २७ विद्यार्थ्यांसोबत डॉ. बी. टी. जाधव, टी. एस. माने, बी. एस. बलवंत व अनिल दडस.**

(रूपेश कदम : सकाळ छायाचित्रसेवा)

याच दहिवडी कॉलेजमधील छात्र सेनेतील २७ विद्यार्थी यावर्षी भारतीय सेनेत भरती झाले आहेत. यापैकी पाच जणांना लेखी परीक्षेत सुटी मिळाली होती. शेवरी, पिंगळी, दानवलेवाडी, जाशी, घोडेवाडी, राजवडी, दिवडी, अनभुलेवाडी, पांगरी, मोही, धुळदेव, नरवणे, किरकसाल, गोंदवले, वडगाव, वावरहिरे या माणमधील गावांसह निढळ, गुरसाळे, सातेवाडी, नायकाचीवाडी या गावांतील हे तरुण आहेत.

### सुपर सत्तावीस...

विशाल सुर्वे, विजय सजगणे, आशिष काटे, तुषार जाधव, सागर चोरमले, रोहित भापकर, मंगेश पाटोळे, शुभम काटकर, शेखर जाधव, राहुल जाधव, ईश्वर जाधव, रविराज चोरमले, रोहित रोमण, चैतन्य खराडे, प्रशांत जगदाळे, समीर इंगळे, रमेश दडस, सचिन राऊत, शिवाजी कोळेकर, सौरभ काटकर, अभिषेक काटकर, राहुल जाधव, आकाश इंगळे, सुधीर हिरवे, चैतन्य भोसले, विजय कचरे व मंगेश बल्लाळ यांनी हे यश संपादन केले आहे.

या विद्यार्थ्यांनी मिळवलेले यश हे कोणालाही पैसे न देता, कुठलीही ॲकॅडमी न लावता फक्त छात्र सेनेतील मार्गदर्शनाच्या बळावर मिळवले असल्यामुळे त्यांचे हे

पान ८ वर »

# माणदेशी २७ हिरो निघाले देशसेवेला

» पान १ वरून

यश झळाळून निघाले आहे. या विद्यार्थ्यांचे २२ महाराष्ट्र बटालियन साताराचे प्रमुख कर्नल बी. एस. काशीद यांनी अभिनंदन केले. प्राचार्य डॉ. बी. टी. जाधव, छात्रसेनेचे प्रमुख कॅप्टन टी. एस. माने व उपप्राचार्य डॉ. बी. एस. बलवंत यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. छात्रसेनेमध्ये आम्हाला योग्य मार्गदर्शन व प्रशिक्षण मिळत असल्यामुळेच आम्ही हे यश संपादन करू शकलो, असे भारतीय सैन्य दलात भरती झालेला एक छात्रसैनिक शिवाजी कोळेकर यांनी 'सकाळ'शी बोलताना सांगितले.

**“ रयत शिक्षण संस्थेला आमच्या महाविद्यालयाच्या माध्यमातून देशसेवेची संधी मिळत आहे. या विद्यार्थ्यांच्या यशाचा आम्हाला आनंद व अभिमान वाटतो. या विद्यार्थ्यांनी देशसेवेच्या मिळालेल्या संधीचे सोने करावे, तसेच इतर सहकारी व तरुणांच्या देशसेवेची आवड निर्माण करावी.**

- **डॉ. बी. टी. जाधव**, प्राचार्य, दहिवडी कॉलेज, दहिवडी

**“ छात्रसेनेतील मुले दर वर्षी भारतीय सेनेत भरती होत आहेत. २०१८ मध्ये १७, २०१९ मध्ये नऊ व यावर्षी २७ मुले भरती झाली आहेत. विद्यार्थी छात्रसेनेत भरती होतानाच सैन्य दलात भरती होण्याची जिद्द आणि चिकाटी बाळगतात. सैन्य दलात भरती होणे हा एकच ध्यास असल्यामुळे त्यांनी हे यश मिळवले आहे.**

- **कॅप्टन टी. एस. माने**, छात्रसेनाप्रमुख

दै. सकाळ, दि. 12-5-21

# गुणवत्तापूर्ण शिक्षणासाठी प्रयत्नशील राहा

## प्रभाकर देशमुख; दहिवडीत कर्मवीर जयंतीनिमित्त ऑनलाइन व्याख्यान

**दहिवडी, ता. ११ :** कोविडमुळे निर्माण झालेल्या कठीण परिस्थितीत सर्व शैक्षणिक संकुलांनी गुणवत्तापूर्ण व स्वावलंबी शिक्षणासाठी सदैव प्रयत्नशील राहावे, असे आवाहन रयत शिक्षण संस्थेचे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य प्रभाकर देशमुख यांनी केले.

पद्मभूषण डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या पुण्यतिथीनिमित्त येथील दहिवडी कॉलेज, महात्मा गांधी विद्यालय व ज्युनिअर कॉलेज, परशुराम महादेव शिंदे कन्या विद्यालय व रयत इंग्लिश मीडियम स्कूल यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित कर्मवीरांना अभिवादन व ऑनलाइन व्याख्यानात ते बोलत होते. यावेळी रयत शिक्षण संस्थेच्या जनरल बॉडी सदस्या नीलिमा पोळ व डॉ. प्रदीप शिंदे, नंदकुमार खोत, एस. डी. जाधव, एस. पी. घाडगे, मुख्याध्यापिका भारती जाधव उपस्थित होते. अध्यक्षस्थानी प्रभारी प्राचार्य डॉ. बी. एस. बलवंत होते. श्री. देशमुख म्हणाले, ''कोविडच्या काळात ऑनलाइन अध्यापन कार्य सुरू आहे. कौशल्याधारित अभ्यासक्रम व कमवा व शिका योजनेत कालानुरूप बदल करून तिच्या प्रभावी अंमलबजावणीतून विद्यार्थांना गुणवत्तापूर्ण व स्वावलंबी शिक्षणासाठी सर्व संकुलांनी नियोजन करणे आवश्यक आहे. कोरोनाबाधित रयत सेवक व संस्थांमधील विद्यार्थी व कुटुंबीयांच्या मदतीसाठी कृती कार्यक्रम राबवावेत. युवकांमधील नैराश्यावर मात करण्यासाठी विविध उपक्रमांचे आयोजन करावे. सर्व संकुलांमध्ये कोविड-१९ नियंत्रक गटाची स्थापना करावी.' डॉ. बलवंत म्हणाले, ''रयत समूह विद्यापीठ स्थापनेस शासननाने दिलेली मान्यता ही रयत शिक्षण संस्थेच्या विकास पर्वातील महत्त्वाची घटना आहे. संस्थेच्या ध्येय, धोरणानुसार व पदाधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनानुसार शिक्षणविषयक उद्दिष्ट साध्य करण्यासाठी आपण सर्वांनी कृतिशील असले पाहिजे.'' प्राचार्य बी. एस. खाडे यांनी प्रास्ताविक केले. डॉ. ए. एन. दडस यांनी सूत्रसंचालन केले. मुख्याध्यापिका इंद्रजिता चव्हाण यांनी आभार मानले. कार्यक्रमात झूमद्वारे रयत सेवक, तर दहिवडी कॉलेजच्या यू ट्युब चॅनलद्वारे विद्यार्थी सहभागी झाले होते.